
धम्म धमाका
ई साहित्य प्रतिष्ठान
बालनेटाक्षरी (ई दिवाळी अंक२०१४ )

धम्म धमाका

बालनेटाक्षरी

ई दिवाळी अंक २०१४

संपादिका … अनघा

मुखपृष्ठ / सजावट हिरे … अनघा हिरे

प्रकाशन … ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
९८६९६७४८२०

email … balnetakshari@gmail .com
९४२२२८४११६

©२०१४ ई साहित्य प्रतिष्ठान –

आली आली दीपावली, मौज वाटे भारी |
उजळुनी निघतील, दिशा चारी चारी || १ ||

काना-कोपरे घराचे, छानसे सजवू |
पाना-फुलांची तोरणे, दारावरी लावू || २ ||

सारे मिळुनिया करू, किल्ला शिवनेरी |
रंगी-बेरंगी चित्रही, मांडू किल्ल्यावरी || ३ ||

झिरमळ्यांचा बनवू, आकाश कंदील |
उंच उंच झाडावरी, दादा तो बांधील || ४ ||

मित्र-मैत्रिणींना धाडू, शुभेच्छांची पत्रं |
तया पाहुनी होईल, आनंद सर्वत्र || ५ ||

पणत्यांची ज्योत देई, मंगल संदेश |
सुख-समृद्धिचा होवो, जीवनी प्रवेश || ६ ||

आई-ताई काढतील, अंगणी रांगोळी |
तेल, उटणे लावुनी, करू या आंघोळी || ७ ||

नव्या-नव्या कपड्यांचा, होई थाटमाट |
गोड-धोड़ फ़राळाचे, येई पुढे ताट || ८ ||

नको नको आवाजाच्या, फटाक्यांच्या लड़ी |
कानामध्ये बसेल हो, कायमची दडी || ९ ||

गाय-वासराची अन, लक्ष्मीची पूजा |
भाऊबीजे सारखा, आनंद ना दुजा ||१०||

© कवी : उपेंद्र चिंचोरे
chinchoreupendra@yahoo.com

## धम्म धमाका फुटला फटाका

धमाल दिवाळी सण आला
बुक्स क्लास होमवर्क संपला
एकदाचा शेवटचा पेपर सुटला
आज सुट्टीचा नारळ फुटला

धम्म धमाका फुटला फटाका
खमंग फराळ चकली चिवडा
लाडू करंजी अनरसा फुगला
मिळून बसुया पाडूया फडशा

धम्म धमाका फुटला फटाका
रॉकेट भुइनळ सुतळी बॉम्ब
गरगर फिरते चक्र जोरात
छोटूची फुलबाजी रंगीत छान

धम्म धमाका फुटला फटाका
जय्यत तयारी जमले मावळे
एक एक दगड बुरुंज तट
बुलंद किल्ला उभा ठाकला
धम्म धमाका फुटला फटाका

.......मंगेश मालती-मधुकर मेढी

# बबलूचा मोबाईल



शाळेची मधली सुटी झाली. लंचबॉक्स घेऊन आठवीच्या वर्गातली मुलं बाहेर धावली. शाळेच्या आवारातल्या बागेत बसून डबा खाण्याची सोय केलेली होती. राजूही धावत डबा घेऊन बाहेर गेला. पण 'ब' तुकडीतला त्याचा मित्र बबलू आलेला दिसला नाही. त्यानं त्याच्या वर्गाशी जाऊन हाक मारली. तसा बबलू ओरडून म्हणाला, "थांब माझा मोबाईल ठेवून येतो दप्तरात."

आणि मग धावत येऊन बबलू आणि राजू नेहमीच्या जागी जाऊन बसले. राजूनं बबलूला चापलं, "अरे, आपली गंमत अशी ओरडून सांगायची असते का?" बबलूनं जीभ चावली आणि सॉरी म्हणाला. पण शेवटी व्हायचं ते झालंच. बबलूच्या वर्गातला मुलगा संजू बबलूचा राग राग करायचा. कारण बबलूनं त्याच्या खोड्यांबद्दल तक्रारी करून टीचरकडुन संजूला

कित्येकवेळा मार बसवला होता ना, बबलू मॉनिटर असताना. त्यानं बबलूनं ओरडून सांगितलेलं ऐकलं होतं. आता कसा सापडला !



संजू भरभर जेवण करून वर्गात आला आणि बबलूच्या दप्तरातला मोबाईल घेऊन सरळ वर्गशिक्षिका मोघेबाईंकडे गेला.

इकडे बबलू वर्गात डबा जागेवर ठेवायला येऊन पाहतो तर मोबाईल गायब. तो रडवेला होत राजूकडे धावत गेला आणि त्याच्या कानात हळूच बोलला, "अरे राजू, माझा मोबाईल चोरीला गेला रे."

"असं मघाशी सांगितलं असतंस हळू आवाजात तर ही वेळ नसती आली." राजू म्हणाला "चल, मोघेमॅडमना सांगूया." दोघेही मोघेबाईंकडे स्टाफरूममध्ये गेले.

"मॅडम, माझा मोबाईल हरवला." रडत रडत बबलू बोलला.

"अरे, पण शाळेत मोबाईल आणायचा नसतो, मग तुझ्याकडे कुठून आला मोबाईल?" मोघेबाईंनी उलट तपासणीच सुरू केली.

"सॉरी मॅडम, माझ्या बाबांनी दिलाय मला घेऊन. मी त्यानं फळ्यावरच्या ग्रुहपाठाचा फोटो काढून घेणार होतो. एखाद्या दिवशी शाळेला बुट्टी मारावी लागली तर माझ्या बेंचवरच्या अमितच्या वहीतून त्या दिवशीच्या अभ्यासाचा फोटो काढून घेता येईल...म्हणून" पण बबलूचा खुलासा मोघेबाईंना पटला नाही.



"बबलू, फोटो काढता येणारा मोबाईल तर अजिबातच चालत नाही शाळेत. ग्रुहपाठ, न झालेला अभ्यास हातानं लिहून घेतला तरच डोक्यात राहील ना? त्याचा अर्थ समजावून घेताना तुझा मोबाईल थोडाच उपयोगी पडणार आहे?"

"चुकलं मॅडम माझं. पुन्हा असं नाही होणार." बबलू खाली मान घालून म्हणाला "... बाबा रागवतील ना आता?" त्याचा रडवेला चेहरा बघून मोघे मॅडमनी त्यांच्या कपाटात ठेवलेला बबलूचा मोबाईल काढून त्याला दिला. तसा कावराबावरा झालेला बबलू जरा

शांत झाला. बाईंनी त्याला संजूनं मोबाईल आणून दिल्याचं सांगितलं आणि असा परस्पर जप्त करून आणून दिल्याबद्दल त्यालाही समज दिल्याचं सांगितलं.

योग्य वस्तूचा वापर योग्य माणसांनी योग्य ठिकाणीच करण्याचा धडा बबलू आणि त्याच्या मित्रांनी घेतला.




श्रीपाद पु. कुलकर्णी

सी २१ सुयोग आदित्य रेसिडेन्सी नं.२,

बिबवेवाडी, पुणे ४११०३७

भ्रमणध्वनी: ९४२२५१५६४०


----------------------------------------------------------

## वाढदिवस



व्योमचा आज दहावा वाढदिवस म्हणून सोसायटीतले मित्र-मैत्रिणी आणि जिवाभावाचे वर्गमित्र जमले होते पार्टीसाठी हॉलमध्ये. नेहाताईनं छान नटवलेला, भरपूर क्रीम असलेला आणि 'हॅप्पी बर्थ डे व्योम' असं आयसिंग केलेला केक आणला होता. वर आडव्या तिडव्या लावलेल्या क्रेपच्या झिरमुळ्यांच्या माळा आणि त्याला बांधलेले फुगे. मध्यभागी मोठ्या



काचेच्या टीपॉयवरच केक विराजमान केलेला. स्वैंपाकघरातून पावभाजीचा खरपूस वास येत होता.

"काकू, व्योम केक कधी कापणार ? त्याच्यासाठी मी गिफ्ट आणलंय ते द्यायचंय ना?" गरगरीत चेंडूसारखा बंटी हे म्हणताच, ओंकार त्याच्या डोक्यात टपली मारत व्योमच्या आईला म्हणाला, "याला भूक लागली असणार आणि गिफ्ट द्यायचं कारण पुढं करतोय."

यावर सगळेच मनापासून हसले.

तेव्हढ्यात ताईनं केकवर खोचलेल्या दहा मेणबत्त्या पेटवल्या. मुलींच्या वेण्यांसारखे पेड घातल्यासारख्या त्या मेणबत्त्यांच्या ज्योती मधेच फुलबाज्यांसारख्या तडतडत होत्या. सगळ्यांनी गलका करत व्योमला त्या फुंकून विझवायला लावल्या. पण गंमत म्हणजे व्योम चारपाच मेणबत्त्या विझवुन मोर्चा राहिलेल्या मेणबत्त्यांकडे वळवता वळवता, इकडे विझलेल्या दोन मेणबत्त्या पुन्हा उजळत होत्या. बिचारा व्योम त्या सगळ्या मेणबत्त्या विझवता विझवता मेटाकुटीला आला आणि बाकीच्यांची हसून हसून मुरकूंडी वळत होती. शेवटी सगळ्यांनी "हॅपी बर्थ डे टू यू" चा सूर लावला आणि व्योमनं केक कापला. आईनं लाडक्या व्योमला केकचा तुकडा भरवला आणि केक ताईच्या

हाती तुकडे करण्यासाठी हवाली केला.
तेव्हढ्यात राजू घुसला मध्येच आणि केकचा तुकडा व्योमला भरवण्याच्या मिषानं लागला की व्योमच्या नाकाला क्रीम



फासायला. व्योम 'नाही नाही' म्हणत चित्कारू लागला. आता मात्र आईनं राजूला मागं खेचलं. राजू म्हणाला "काकू, माझ्या दादाच्या वाढदिवसाला त्याच्या मित्रांनी अशीच गंमत केलेली पाहिली ना मी."
"थांब राजू." असं म्हणून आई स्वैंपाकघरात गेली आणि एका छोट्या मुलीला घेऊन बाहेर आली. गबाळा अवतार असलेली छाया त्यांच्या सैंपाकीणबाईंची मुलगी. तिच्या हातात एक रिकामी वाटी दिलेली होती.
"ज्या कुणाला तो केक व्योमच्या चेहऱ्याला फासायची हुक्की आली असेल त्यांनी केकचा स्वतःला मिळालेल्या तुकड्यातला काही भाग हिच्या वाटीत वाढायचा. केक नासायचा नाही अजिबात. हिला दोन वेळचं अन्न मिळावं, हिच्या शाळेचा खर्च भागावा म्हणून हिची आई चार घरचे स्वैंपाक-भाडी करते. हिच्या वाढदिवसाला नवे कपडे नसतात, भाजी-भाकरीचंच जेवण असतं. तिथे केक कुठून मिळणार? तुम्ही मात्र महागडा केक कापून एकमेकांच्या तोंडाला

फासणार?"

व्योमचे मित्र हे ऐकून खजिल झाले. राजूनं उचललेला केकचा तुकडा त्यावरच्या चेरीसकट छायाच्या वाटीत ठेवून दिला. व्योमनं बंटीनं दिलेला पेन्सिलचा बॉक्स तिच्या हातात ठेवला. तिनं बावरून व्योमच्या आईकडं पाहिलं. स्वैंपाकघराच्या दारात उभ्या असलेल्या छायाच्या आईनं डोळ्याला पदर लावलेला. छायानं पळत जाऊन तिला मिठी मारली. सगळ्यांनी टाळ्या वाजवल्या.

श्रीपाद पु. कुलकर्णी
सी २१, सुयोग आदित्य रेसिडेन्सी नं.२,
बिबवेवाडी, पुणे ४११०३७
भ्रमणध्वनीः ९४२२५१५६४

## रोग करा वेळीच बरा



"अहो बाबा, आमच्या शाळेतल्या ९ वीतल्या गंपूला सरांनी गुटखा खाताना रंगेहाथ पकडलं. गुटखा म्हणजे काय हो बाबा?" गजाभाऊ पेपर वाचत असताना, खेळून आलेल्या बन्यानं ही बातमी त्यांना ऐकवली. अर्थात टिन्या होताच बरोबर.

"काही नाही रे, मसालेदार सुपारीच पण त्यात आरोग्याला अपायकारक अशी तंबाखूही असते. गुटख्याचं व्यसन वाईटच. त्यामुळे तोंडाला फोड येऊन कॅन्सरसारखा रोगही होऊ शकतो. म्हणून गुटख्यावर बंदीही घातलीय. तरी कसं त्या मुलाला मिळतो गुटखा आश्चर्यच आहे. आहे केवढा तो मुलगा?" गजाभाऊंनी विचारलं.

"काका, गंपू २ वर्ष झाली नववीतच आहे. सगळ्या शिक्षकांचा मार खाऊन कोडगा झालाय. त्याला इतर मुलं घाबरतात आणि म्हणून इतके दिवस सरांना हा त्याचा उद्योग समजला नाही. पण आज सापडला. त्याच्या पालकांना बोलावलं होतं, त्यांनी सांगितलंय काय पाहिजे ती शिक्षा करा म्हणून." टिन्यानं

सांगितलं.

"अरे एकदा शिक्षा करून तो ती सवय सोडेल याची काय खात्री. कारण हे व्यसन आहे आणि ते सहजी सुटत नाही. नाहीतर धनपत शेटजींनी आपल्या दिवट्या मुलाला त्याच्या खोड्यांबद्दल कंटाळून पंडित गुरुजींकडे कशासाठी सोपवलं असतं?" गजाभाऊंचं हे ऐकून मुलं एकमेकांकडे पाहू लागली. तसे गजाभाऊच पुढे सांगू लागले,

"धनपत शेटजींचा एकुलता एक लाडावलेला मुलगा बाजा, खरं म्हणजे नावाप्रमाणेच बाजीराव, पण सारखा कुणाचातरी हा 'बँड' वाजवायचा आपल्या करामतींनी, म्हणून 'लाडानं' सारे त्याला 'बाजा'च म्हणायचे. तर ह्या बाजाला पॉकेटमनी मिळायचा वाटेल तेवढा आणि हाही उडवायचा ऐश करण्यात मित्रांबरोबर. मित्रांबरोबर पार्ट्या, त्यात दारू पिणं, बिड्या - तंबाखू, पुढेपुढे तर अफु, गांजा इथपर्यंत मजल गेली बाजाची. त्याला गाडी दिलेली ती घेऊन कुठेही जायचा मित्रांना घेऊन सहलीला, जाईल तिथे हॉटेलची, तिथल्या बागेची नासधूस करून वडिलांकडे तक्रारी आणायचा मग नुकसान भरपाई देता देता धनपतची पत जायची वेळ यायची. तरी याच्यात सुधारणा नाही. नोकराचाकरांना शिवीगाळ करायचा. मोठ्यांना उलट उत्तरं द्यायला मागंपुढं बघायचा नाही. अभ्यासात तर आनंदच होता, एका इयत्तेचाच २ - २ वर्ष अभ्यास 'पक्का' करायला बघायचा म्हणा ना!

धनपत शेटजींना वाटायचं हा आपली भलीमोठी शेती बघेल, कापडाचा कारखाना चालवेल, स्वतःच्या पायांवर

उभा राहून आपलं नाव ठेवेल. पण कसचं काय, शिक्षण पूर्ण करायचाच पत्ता नव्हता अजून. घराच्या मागे पसरलेली बागही बघायला त्याला त्याच्या हुंदडण्यातून वेळ मिळेल तर ना!

धनपत शेटजींना पंडित गुरुजींची आठवण झाली. त्यांना शिकवायला होते ते शाळेत. आता निव्रुत्त होऊन निवांत देव देव करत बसायचे. धनपत शेटजी शक्य तेव्हा त्यांना भेटायचे, त्यांना हवं नको बघायचे, गुरुपौर्णिमेला त्यांना भरभरून गुरुदक्षिणा द्यायला त्यांच्या घरी जायचे. एकदा त्यांनी त्यांच्या कानावर बाजाचं गाह्राणं घातलं आणि त्याला शिकवायच्या निमित्तानं घरी यायला सांगितलं. म्हणाले, 'गुरुजी, काही करा पण त्याच्या वाईट सवयी जातील असं काहीतरी करा.' गुरुजी दुसय्रा दिवशीच घरी हजर बाजाच्या.

धनपत शेटजींनी बाजाला त्यांच्या पाया पडायला लावलं. गुरुजींनी बाजाला सांगितलं, 'मला तू तुमचं सारं घर दाखवायचं, बाग दाखवायची आणि मगच तुझी शिकवणी चालू.' बाजाला काय कुणीकडून एका जागी बसायचंच नसायचं. चला आज आपली भलीमोठी बाग हिंडवून आणू म्हणजे गुरुजी थकून जातील आणि मग कसली शिकवणी आणि कसलं काय! मग आपण मोकळे नेहमीसारखे मित्रांबरोबर हुंदडायला.

धनपत शेटजींनी बाग फुलवायला कष्ट घेतल्याचं जाणवत होतं. मऊ गवताच्या पायवाटा, लॉन, मधेच छोटी छोटी तळी त्यात बदकं, कडेला फुलझाडं,

तह्रेतह्रेची झुडपं, झालंच तर पोपई, केळी, आंबा, पेरु यांची वाडलेली झाडं अशी सारी बाग बहरलेली. हिंडता हिंडता गुरुजींनी दुर्वा खुडायला सांगितल्या बाजाला. बाजानं आपल्या चिमटीत सहज पाहिजे तेवढ्य़ दुर्वा काढून दिल्या गुरुजींना. थोडं पुढं गेल्यावर गुरुजींनी जास्वंदीच्या फुलांचं एक रोपटं काढून देतोस का म्हणून बाजाला विचारलं. त्यानंही लगेच त्या रोपाला हात घातला, थोडीशी झटापट केली त्या रोपट्याशी आणि दिलं काढून गुरुजींच्या हातात.

थोड्या अंतरावर गुरुजींना दिसली शोभेच्या झाडांची झुडपं. गुरुजींनी तिथे एकमेकांच्या लगत असलेल्या झुडपांचा एक गुच्छाच मागितला बाजाला. बाजाला आता मात्र जरा जोरच लावावा लागला तो झुडपांचा गुच्छा काढायला. कारण वाटतं तेवढं ते काम सहज सोपं नव्हतं. एकतर ती जरा मोठी झालेली आणि एकमेकांत गुंतलेली. तरी पण गुरुजींचं काम फत्ते केलंच की. आता बाग जवळजवळ दाखवून झालेली म्हणून बाजा गुरुजींना घेऊन परत फिरला तसं गुरुजींनी बाजाला विचारलं, 'काय रे बाळा, ते झाड कसलं रे?' बाजानं झाडाच्या फांदयांकडं पाहिलं अन त्याला हायसं वाटलं. कारण त्याला ते कसलं झाड आहे हे कुठं माहित होतं? झाडाला लागलेले छोटे छोटे पेरु पाहून तो बोलला, 'पेरुचं.' गुरूजी म्हणाले, 'अरे, कित्ती झाडं आहेत पेरूची तुमच्याकडं. हे एक मला देतोस का माझ्या घरी लावायला?' बाजाला काय! गुरुची आज्ञा शिरसावंद्य. त्यानं ते झाड गुरुजींकडे कसं लागणार अन त्याला पेरु कसे येणार याचाही

विचार केला नाही आणि घातला हात त्या झाडाच्या खोडाला उपटण्यासाठी.

आता मात्र बाजाला ते शक्य नाही हे लक्षात आलं. त्याला ते झाड मुळापासून उपटणं शक्य नाही

हे त्यानं कबूल करुन टाकलं. तेव्हा गुरुजी हसून त्याल म्हणाले, 'बाळा, या झाडाची मुळं इतकी खोलवर गेली आहेत की आता ते उपटणं सहज शक्यच नाही. जोपर्यंत झाड कोवळं असतं, तोपर्यंतच त्याला काही रोग झाला असेल तर ते झाड मुळासकट उपटून



टाकता येतं किंवा इकडून काढून तिकडे लावता येतं. एकदा का मुळं खोलवर गेली की ते झाड काढणं मुश्कील. बेटा, तुझ्या अंगी ज्या वाईट सवयी आहेत ना, त्याही जेव्हा लागल्या तेव्हाच दूर करता आल्या असत्या. अजूनही वेळ गेलेली नाही. तु या व्यवहारी जगात पाऊल टाकायच्या आधी जर त्या सोडल्यास तर तुझं भलंच होईल आणि तुझ्या वडिलांची तुझ्याविषयीची चिंताही.'

बाजाचे डोळे आता मात्र खाडकन उघडले आणि त्यानं

गुरुजींना वचन दिलं की मी माझ्या सगळ्या वाईट सवयी सोडून देईन, तुम्ही सांगाल तसा नीट अभ्यास करेन आणि वडिलांचा व्यवसाय सांभाळेन. खरोखरच तो चांगला वागू लागला. धनपतशेटजींना खूप आनंद झाला."

"खरंच. एक नंबर धडा मिळाला त्या बाजाला गुरूजीकडून ज्यांनी त्याला इतक्या डोळसपणे त्याचीच बाग दाखवली." बन्याचं हे बोलणं ऐकून गजाभाऊ खुर्चीत मागे रेलत समाधानानं हसले.

श्रीपाद पु. कुलकर्णी
सी २१, सुयोग आदित्य रेसिडेन्सी नं.२,
बिबवेवाडी, पुणे ४११०३७
भ्रमणभाषः ९४२२५१५६४०

---------------------------------------------------------



## ढग्ग ढग्गोब्बा

आभाळात कशी चालली मस्ती
ढगांची ढगांशी जुंपली कुस्ती
आज सगळे भिडले वरती
तुझी जास्ती का माझी जास्ती
बघुया कोणाची किती शक्ती

ढग्ग ढग्गोब्बा जय पावसाळा
धडका धडकी ढकल डाव
वाऱ्याच्या रथात आले स्वार
विजेचा बाण अन जिरली सारी
हरुन उतरले डोंगरावरी
फुटून बरसले धरतीवरी

ढग्ग ढग्गोब्बा जय पावसाळा
ढगांची दुलइ कुडकुड थंडी
वानरसेना हरवली सारी
ढगाच्या मीठीत गंमत न्यारी
चोर तो पळतो भारी
हातात कसा येतच नाही

ढग्ग ढग्गोब्बा जय पावसाळा
डोंगराची अंघोळ पाणीच पाणी
नदीची पिल्ले पळतात कशी
त्यांच्या मागे टोळी आमची
बेडूक मधेच काढतो खोडी
माशांच्या पाठी कागदाची होडी

ढग्ग ढग्गोब्बा जय पावसाळा

मंगेश मालती-मधुकर मेढी.

------------------

# गाइ गाइ

गाइ गाइ कलु चला गाइ गाइ कलु
झोपत हशु चला हशत बोलु
बाप्पाशी बोलु चला बाप्पाशी बोलु
बाप्पाला भेतू चला बाप्पाला भेतू
गाइ गाइ कलु.......
श्वपनात जाऊ चला श्वपनात जाऊ
ढगात शिलु चला ढगावल बशु
धलाम धलुम घंता छालेत जाऊ
गाइ गाइ कलु.......
ढगाच्या शालेत मऊ मऊ खुलची
गोद गोद पली मिस चंदेली पंकाची
पली बाइंना भेतू चला पोम मनु
गाइ गाइ कलु.......
चमचम छली तीची दादु बगु
निला निला फला, लुकलुक स्तोली
गोत्तीची गंमत जंमत ऐकू
गाइ गाइ कलु.......
दादुच्या पातीवल चितल कालु
माजीक पेशीलने एबीशीली लिहु
हवेत ऊलु चला लथात बशु
गाइ गाइ कलु चला गाइ गाइ कलु
गाइ गाइ कलु चला गाइ गाइ कलु
गाइ गाइ कलु चला...........

________मंगेश मालती-मधुकर मेढी

## दंगा मस्ती

दंगा मस्ती करु चला धुमधडाका करु चला
अरे दंगा मस्ती करु चला आईला त्रस देऊ चला

सगळ्या वस्तू पाडू चला इकडचे तिकडे करु चला
खेळणी सगळी मांडूया नाहीतर सरळ मोडूया
होऊ देत सगळा पसाराच पसारा

अरे दंगा मस्ती........

उचका पाचक करुया बाबांचा फ़ोन ओढूया
इकडून तिकडे पळूया अजोबांना जरा दमवूया
उडूदेत नुसता धंगाणाच धिंगाणा

अरे दंगा मस्ती........

काकाशी मस्ती करुया आरडा ओरडा करुया
आरोळ्या किंकाळ्या एकच कल्ला खुप खुप मज्जा
येई घरा
होऊ देत कसा गोंगाटच गोंगाट

अरे दंगा मस्ती........

अजोबांचा चष्मा पळवूया घर डोक्यावर घेवूया
कंटाळा उडवून लावूया मस्त नाचू गाऊया
करुयात नुसती मज्जाच मज्जा

दंगा मस्ती करु चला धुमधडाका करु चला
अरे दंगा मस्ती करु चला आईला त्रस देऊ चला

मंगेश मेढी.

-----------------------------------------------

# आली सुट्टी

आली सुट्टी शाळेला बुट्टी
आजोबांशी गट्टी काकाशी मस्ती
धमाल दंगा धुडगुस नुसता
खेळण्याचाच हा उद्योग आमचा
जांभळचा पऊस कैऱ्यांची हाऊस
करवंदाची गोडी कलींगडाच्या फ़ोडी
आली सुट्टी.....
पोहण्याची धमाल पत्त्यांची कमाल
सायकलची रपेट अन क्रिकेटची विकेट
बुद्धी-बळाचा डाव आईसक्रिमवर ताव
कॅरमची बाजी संगे चिवड्याची वाटी
आली सुट्टी.....
शिवणा-पाणी धावा-धाव
चोर-पोलीस अन लपंडाव
व्हिडीओ गेम कार्टून प्रेम
सहलीची वारी नाटकाची बारी
आली सुट्टी.....
मामाचा वाडा लाडाचा पेढा
आंब्याची पाटी-रसाची वाटी
आजीच्या गोष्टी गमती जमती
अशीही सुट्टी मज्जाच नुसती...मज्जाच नुसती
-----------------------------------------

## खेळ खेळुया

खेळ खेळुया मैदानी खेळ खेळुया
अरे खेळ खेळुया मैदानी खेळ खेळुया
नको कार्टून नको गेम्स खेळू खोखो आणी हूतूतू
कधी लपंडाव कधी लगोरी  शिवणापणीची मज्जाच
न्यारी

खेळ खेळुया.....
नको व्हिडीओ नको कॉमप्युटर  खेळू फुटबॉल आणी
व्हॉलीबॉल
कधी आट्यापाट्या कधी सुरपारंब्या
विट्टी दांडूत रमून तर बघा

खेळ खेळुया.....
नको झोप नको घरात खेळू छप्पी आणी रुमाल पाणी
कधी हॉकी नाहीतर क्रिकेट आहेच आपली
कब्बडीत दम दखवून तर पहा

खेळ खेळुया.....
नको भांडण नको तंटा खेळू चोर आणी पोलीस
डब्बा उडवून पळूया  दोरीच्या उड्या मारुया
पकड पकडी करुन तर पहा

खेळ खेळुया.....
नको रुसून नको बसून  खेळू लंगडी आणी खाम-
खांबोळी

चला मैदानात उतर या  कूस्तीचा डाव टाकून तर पहा

खेळ खेळुया.....
खुप खुप मस्ती करुया  शक्ती आपली वाढवूया
खुप खुप मज्जा करुया  बुद्धी आपली वाढवुया
खेळ खेळुया मैदानी  खेळ खेळुया
अरे खेळ खेळुया मैदानी  खेळ खेळुया

Mangesh M-M Medhi
9881490147(C)
9762049150(H)
www.mangeshmedhi.blogspot.in

## गोष्ट सुमितची.... .!

सकाळी सकाळी सुमित उठल्यावर कधी छान मूड मध्ये जागा झाला आहे ,असे होत नसे . त्रासिक चेहेऱ्याने उठणार ,घरभर इकडे तिकडे पहाणार आणि किरकिऱ्या आवाजात आईकडे कशाचे ना कशाचे टुमणे लावणार , आईने कितीही प्रेमाने ,मायेने आवाज दिला तरी सुमितच चिडूनच बोलणार . जणू काही सकाळ झाल्यामुळे सुमितवर फार मोठा अन्याय झाला आहे.

आई नेहमी विचार करीत असे , या मुलाचा स्वभाव असा विचित्र कशामुळे झाला असेल बर ?

कधीही याच्याशी बोला , याचे रडगाणे सुरूच असते . स्वतहा आनंदात रहात नाही आणि दुसऱ्यांना राहू देत नाही.

वास्तविक सकाळची वेळ किती छान असते. उगवलेली नवी पहाट-एक नवा आनंद घेऊन येत असते . रात्रभर झोपी गेलेली माणसे - सकाळी उठून नव्या जोमाने ,उत्साहाने आपल्या कामाला लागतात. थकलेले शरीर आराम करून ,ताजेतवाने झालेले असते. आदले-दिवशी केलेले संकल्प आपण पहाटेच्या

प्रहरी पुन्हा आठवतो आणि ते पूर्ण करण्याच्या कार्यास आरंभ करीत असतो. वयाने लहान -की मोठा असा प्रश्नच नसतो .लवकर निजे -लवकर उठे ", किती सिध्द अशी म्हण " आहे. शरीर आणि मन दोन्ही प्रसन्न होऊन जातात या अशा सवयीने .

पण , ! हा मोट्ठा पण ", आपल्या मित्राच्या -सुमितच्या स्वभावात .अडथळा बनून राहिला होता. आईला वाटत असे,की चांगल्या गोष्टींचे या सुमितला जरा वावडेच आहे. त्याला काही चांगली पाहवत नाही, कुणी काही चांगले दाखवत असेल तर ते पाहवत नाही . समोरचा कुणी जे सांगेल -त्याच्या विरुध्द वागणे -त्याला फार आवडायचे . विरोधासाठी -विरोध "असा विचित्र स्वभाव होता सुमितचा .त्यामुळी तो मनाने तर प्रसन्न नसायचा ,आणि त्याच्या एकट्याच्या या अशा वागण्यामुळे त्याच्या घरात ही "प्रसन्नता" वाटत नसे.

मित्रांनो तुम्ही म्हणाल - सुमित बद्दल आम्हाला काय सांगताय -तो आमचा थोडाच मित्र आहे ? अगदी बरोबर आहे तुमचे , मी हे या साठी सांगतो आहे की - सुमित स्वतःच्या घरात असे वागत असता तर एक वेळ ठीक होते.चार-भितींत निभावले असते .सुमितच्या घरातील माणसांना त्याचा त्रास- आपल्याला काय त्याचे ? तुमचे हे म्हणणे मान्य नाही. कारण- माणसाचा स्वभाव घरी-दारी सारखाच असेल तर ?, त्रास होणाऱ्या माणसांची संख्या वाढत जाणार की नाही ? आणि या सुमित सारखे वागणारे

आणखी अनेक सुमित ", आजूबाजूला असू शकतात . अशावेळी मित्र म्हणून आपले कर्तव्य आहे की- अशा स्वभावाच्या मित्राला समजावून सांगण्याचा प्रयत्न करायचा , त्याच्याशी मैत्री न करणे ", हा उपाय करू नका . एक लक्षात ठेवा -सुमित कसा ही असला तरी एक माणूस आहे-त्याला समजावून घेऊन सांगा , काय सांगावे -तुमच्या सहवासाने त्याच्यात फरक पडेल सुद्धा .

-------------------------------------------------------------------

अरुण वि.देशपांडे -पुणे .

मो- ९८५०१७७३४२

-----------------------------------------

## चंद्राचे वय १०० दशलक्ष वर्षांनी कमीच!

**पृथ्वी आणि चंद्राबाबत मानवामध्ये मोठे आकर्षण आहे.**

**चंद्र कसा बनला याबाबत अनेक मतप्रवाह आहेत.**



पृथ्वी आणि चंद्राबाबत मानवामध्ये मोठे आकर्षण आहे. चंद्र कसा बनला याबाबत अनेक मतप्रवाह आहेत. हे गूढ उलगडण्यासाठी शास्त्रज्ञ मोठय़ा प्रमाणात संशोधन करीत आहेत. चंद्र हा ४.४ ते ४.४५ अब्ज वर्षापूर्वी तयार झाला असावा, असा शास्त्रज्ञांचा कयास आहे. मात्र आपल्या चंद्राचे वय शास्त्रज्ञांच्या अंदाजापेक्षा १०० दशलक्ष वर्षांनी कमी असल्याचे उघड झाले आहे.

चंद्राचे वय शोधून काढण्यासाठी तेथील खडकांवर स्फोट घडवले. त्यानंतर केलेल्या संशोधनातून ही बाब समोर आली असल्याची माहिती वर देण्यात आली आहे. आपल्या चंद्राच्या निर्मितीनंतर त्यावर एक विशिष्ट प्रकारच्या द्रवरूप खडकाचे महाकाय असे महासागर तयार झाले होते.

या खडकांमार्फत चंद्राचे अचूक वय निश्चित करण्यात आले असल्याचे कार्नेजी इन्स्टिटय़ूट फॉर सायन्सचे रिचर्ड कार्लसन यांनी सांगितले. या संशोधनानुसार चंद्राचे अचूक वय हे ४.३६० अब्ज इतके असल्याचे समोर आले आहे. चंद्र व पृथ्वी यांच्यात टक्कर झाली होती. याचा परिणाम पृथ्वीचा आकार बदलण्यावर झाला असल्याचे पुरावे शास्त्रज्ञांकडे आहेत.